MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**One Day National Interdisciplinary Conference 28 April 2023**

**Organized by Rayat Shikshan Sanstha's Prof. Dr. N.D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)**

**Rayat Shikshan Sanstha's**

## Prof. Dr. N. D. Patil Mahavidyalaya, Malkapur (Perid)

## One Day National Interdisciplinary Conference

## On

## Literary Trends and Issues in 21st Century

**Friday, 28 April 2023**

**Organized by**

**Departments of Marathi, Hindi, English, and IQAC**

---

## Chief Editor: - Dr. Gholap Bapu Ganpat

---

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

Date of Publication
28th April 2023

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

www.विद्यावार्ता.कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT 9.154 iijif FACTOR

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • Certified Quality Management System • ISO 9001:2015 • International Multilingual Research Journal

PRINCIPAL
Shivaji College HINGOLI

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

http://www.printingarea.blogspot.com

# Our Patrons

**Hon. Shri. Sharadchandra Pawar**

President, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Dr. Anil Patil**

Chairman, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Prin. Dr. Vitthal Shivankar**

Secretary, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Prin. Dr. Shivling Menkudale**

Joint Secretary, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Dr. Yashwant Thorat**

Member, Managing Council, Rayat Shikshan Sanstha, Satara

**Hon. Saroj Patil (Mai)**

Member, Managing Council, Rayat Shikshan Sanstha, Satara

## Organizing Committee

| President | IQAC Coordinator | Convener | Coordinator |
|---|---|---|---|
| Prin. Dr. T.N. Gholap | Dr. S.B.Pore | Dr. B. A. Sutar | Prof. S.K. Shaikh |

**Co-Coordinators**

Dr. S. K. Khot 8830111509 (Hindi) Prof. S.N.Chavan 9850255584 (English) Smt. Phadtare S. S

**Members**

Prof. Patil N. M. Dr.Adnaik N. S Prof. Giri C.S. Prof. Dr. Bansode S.P. Dr.Sutar R.S.

Prof. Bhandare S.A. Mr.Kamble M.D.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

# INDEX

01) एकविसाव्या शतकातील मराठी नाटक
प्रा.उज्ज्वला भोर, कोपरगाव ||13

02) बारोमास कादंबरीतील प्रभावी स्त्रीव्यक्तीरेखा
डॉ. योगिता मारुती रांधवणे, श्रीरामपूर ||20

03) एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरी 'नियोग'
डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे, ता.जि. धुळे ||22

04) एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कविता
प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे, हिंगोली ||26

05) एकविसाव्या शतकातील मराठी कथा (संदर्भ: 'खुरपं' सुचिता घोरपडे)
डॉ वर्षा शिरीष फाटक, जिल्हा रत्नागिरी ||30

06) एकविसाव्या शतकातील आश्वासक शब्दबंध 'कोलाहलातील मौनाक्षरं'
डॉ. सतीश कामत, फोंडाघाट (सिंधुदुर्ग) ||36

07) ग्रामीण माणसांचे अस्वस्थ वर्तमान —'सांगावा'
प्रा.डॉ.सागर अशोक पाटील, मिरज ||39

08) एकविसाव्या शतकातील मराठी स्त्रीलिखित कथा
डॉ. सीमा जयसिंग मुसळे, मुंबई ||42

09) मी रांगेतच उभा आहे : एकविसाव्या शतकातील वास्तव मांडणाऱ्या कविता
तुषार ज्ञानेश्वर पाटील, पुणे ||49

10) एकविसाव्या शतकातील ललितगद्य आणि हिमांशू स्मार्त यांचे ललितगद्याचे आशयविशे
श्रीराम सीताराम मोहिते, कोल्हापूर ||53

11) एकविसाव्या शतकातील गोमंतकीय कवयित्रींची कविता
प्रा. सोनिया मनोहर सावंत, केपे— गोवा ||60

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

अतिशयोक्ती ठरणार नाही.

**निष्कर्ष :—**

'नियोग' कादंबरीत विवाहबाह्य मातृत्व आणि लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी स्त्री—पुरुष जननक्षमता नष्ट करण्यासाठी नवीन संशोधनातून धीटपणाने आशय व्यक्त करणारी आहे.

प्रस्तुत कादंबरी वाचकांच्या दृष्टीने अत्यंत उत्कंठावर्धक आहे.

कादंबरीतील चार पात्रे अमेरिकेतील घेतले आहेत.

समाजजीवनाचे वास्तव चित्र कादंबरीत अधोरेखित केले आहे.

कादंबरीकाराने आपल्या अनुभवविश्वाच्या निरीक्षणातून वैविध्यपूर्ण व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

'नियोग' कादंबरीत आशयसंपन्न कथानकाची निवड केली आहे.

२१व्या शतकातील नवी कादंबरी म्हणून नव्या पिढीला नवीन जीवनदृष्टी देणारी कादंबरी आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१) कुळकर्णी अरविंद वामन, 'साहित्याची सामाजिकता', लेखांतर्गत 'साहित विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १५ जुलै १९९७, पृ. १३६—१३७.

२) पाध्ये दिगंबर, 'साहित्य, समाज आणि संस्कृती', न्यु एज प्रिंटींग प्रेस, मुंबई, तिसरी आवृत्ती, ऑक्टो. २००५, पृ. ३७.

३) देशमुख सी.डी., 'नियोग', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती—२००६.

⌘⌘⌘

**04**

# एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कविता

**प्रा डॉ श्रीराम मारोतराव कऱ्हाळे**
मराठी विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**********

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. त्या शेतीचा शोध स्त्रीने लावला आहे. शोधाचे श्रेय तिला द्यावे लागते. प्राचीन काळी स्त्री पुरुष समानता होती.आर्यांच्या आक्रमणानंतर पुरुषसत्ताक व्यवस्थेला बळकटी मिळाली. त्याचे स्त्रीवर वर्चस्व निर्माण होवून कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. स्थावर आणि जंगम मालकी प्रमाणेच स्त्रीवर आणि तिच्या मातृत्वावर ही मालकी प्रस्थापित केली. सातत्याने वाढता संघर्ष, असुरक्षितता, लैंगिक शोषण यामुळे स्त्रीला पुरुषाच्या वर्चस्वाखाली जगावे लागले. स्त्रियांवर जास्त बंधने घातली गेली. स्त्रीकेंद्री असणारी अर्थसत्ता जाऊन, पुरुषाचे आर्थिक वर्चस्व प्रस्थापित झाले. पुरुषसत्ताक व्यवस्थेने रूढी, प्रथा, चालीरीती, संकेत ह्यांच्या माध्यमातून स्त्रियांचे शोषण केलेले दिसते. या पुरुषी व्यवस्थेच्या शोषणाला झुगारून देण्यासाठी स्त्रीवादी चळवळीचा उदय झालेला दिसतो.

"आजची भारतीय स्त्री चळवळ पाश्चात्य स्त्रीवादामुळे प्रभावित झालेली असली, तरी तिचा उगम वास्तविक एकोणिसाव्या शतकात सुरू झालेल्या समाजसुधारणा चळवळीतूनच झालेला आहे.''१ हे तपासून पाहताना,'' स्त्रीवाद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून स्त्रीला व्यक्तीसारखं जगू द्या, तिच्याकडे सन्मानाने बघा, तिलाही भावना, मन आहे, ती ही एक हाडा मासांची व्यक्ती आहे, तिलाही कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अधिकार आहेत, हे आपण मान्य करायला हवे म्हणजे स्त्रीवाद होय.''२.

PRINCIPAL
Shivaji College, HING

सार्वजनिक जीवन जगताना स्त्रीला स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. समाजात जीवन जगत असताना काही तडजोड करावी लागते आणि सामंजस्याची भूमिका घ्यावी लागते. अशावेळी व्यक्तिगत स्वातंर्त्यावर काही बंधने पडत असतात, असा एक प्रश्न स्त्रीवादाच्या अनुषंगाने उपस्थित होताना दिसतो.

भारतात विसाव्या शतकात स्त्रीवादी चळवळीला सुरुवात झाली होती. मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्याची चळवळ १९६० पासून निर्माण झालेली दिसून येते. या साहित्यात चळवळीत प्रत्येक दशकामध्ये भर पडतच गेलेली आहे आज विचार केला असता अनेक स्त्रीवादी कवित्रीने आपली लेखणी स्त्रीवादी साहित्य उभारण्यासाठी उचलल्याचे दिसून येते यामध्ये अश्विनी धोंगडे मंगला वरखडे नीरजा,सानिया ,अरुणा ढेरे,तारा भवाळकर यांनी स्त्रीवादी समीक्षा केली आहे गौरी देशपांडे अंबिका सरकार, सानिया, मेघना पेठे, प्रतिमा इंगोले अरुणा देशमुख, आशा बगे, ज्योती लांजेवार कविता महाजन, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील हिरा बनसोडे यांनी साहित्याची चळवळ चालविली आहे.

विसाव्या शतकातील साहित्याची निर्मिती खूप मोठ्य प्रमाणावर झालेली दिसून येते पण काळानुसार स्त्रीला सातत्याने संघर्ष करावा लागत आहे म्हणून विसावे शतक संपले तरी २१ व्या शतकातही स्त्रियांची तीच दैनीय अवस्था आहे. सातत्याने साहित्य लेखनाच्या माध्यमातून ती समाजात आपले स्थान निर्माण करू पाहते आहे. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीवादी जाणीव निर्माण होताना दिसतात.

एक स्त्रीवादी कवयित्री म्हणून स्वाती शिंदे–पवार यांच्या कविता अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचा स्त्रीकोष हा काव्यसंग्रह २००५ साली प्रकाशित झाला. तसेच प्रेम म्हणजे प्रेम आणि वाटेवरती काचा ग हे त्यांचे दोन काव्यसंग्रही प्रकाशित झालेले आहेत. जगातील मानव प्राणी, जीवजंतू स्त्रीकोषाशिवाय या सृष्टीत येऊ शकत नाही ही नवनिर्मितीची महान शक्ती केवळ स्त्रीजवळ आहे. याच गर्भातील जीव जन्म घेताना कशा वेदना देतो ते सांगताना कवयित्री म्हणतात.,

''जन्म जेव्हा घेते मुलगी
हळुवार वेदना देते
पोराच्या जन्मावेळी बाई अंगोअंगी फुटून येते' ''३

स्त्रीकोष या काव्यसंग्रहातील उजवं घर या कवितेमधून गर्भधारणा ते बाळंतपण या कालावधीतील वेदना कवयित्री या ठिकाणी टिपतात. स्त्री सहनशील आहे आणि पुरूष कसा वेदना देणारा आहे हे स्वानुभवातूनच जणू त्या मांडतात असे या कवितेतून जाणवते. मुलगी गर्भात असताना आणि जन्मवेळी सुद्धा आईला वेदना देत नाही. परंतु मुलगा गर्भात, जन्म घेताना वेदना देतोच पुढेही तो मुलगा, पती, सासरा अशा रूपात स्त्रीची गळचेपी करतो. हाच संदेश ही कविता देते. त्या मुलीला उजवी बाजू चालण्याचे म्हणजेच धाडसाचे संस्कार आपोआपच होतात. हेच कवयित्रीने कवितेतून निदर्शनास आणून दिले आहे.

"मला बघायचंय एकदा
तुझं पोट वाढताना
अन् कात्रीनं डॉक्टर तुला
करकर फाडताना"४

स्त्री मनातील राग जेव्हा अनावर होतो, तेव्हा त्या शब्दरूप होतात. गर्भावस्थेतील यातना भयावह असतात, याही पेक्षा बाळंत होतानाच्या यातना जीवघेण्या असतात. हे सर्व या स्त्रीने सहन केलेले आहे. आता ती सहन करणार नाही. पुरूषाला बाळंतपणाचा अनुभव देण्याची भाषा करणारी ही कविता उग्ररूप धारण करणारी व निर्भिड भाषा वापरलेली आहे. एकूणच या काव्यातून मनाचा तळ फुटून मनातील संवेदना भावदर्शी झालेली दिसून येते.

'म्हणून सांगते बायांनो
फणा काढून तयार राहू
येईल जेव्हा वेळ तेव्हा
विषारी नागीण होऊ ''५

स्त्रीवादी चळवळीची दर्शक म्हणून स्वाती शिंदे–पवार यांनी आपली कविता साकारल्याचे दिसून येते. स्त्रीदास्यत्वाची कहाणी सांगून स्त्रियांनी ती जागृत करते. आपणच आपले सरंक्षण करण्यासाठी ती प्रेरणा देते. कोणत्याही परिस्थितीत आपल्यावर आलेल्या संकटाला सामोरे जाण्यासाठी सर्व स्त्रियांच्या मनाची खंबीरपणा वाढविताना ही कविता बंडाची भाषा करते.



PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

ही कविता प्रस्थापित व्यवस्थेला नकार देऊन आपल्यातील निद्रिस्त शौर्याला जागृत करत साकारलेली आहे.

''म्हणून वाटतं बायांनो
आता तरी जाग्या राहू
घडवायचं पुन्हा शिवाजी
घरा—घरात जिजाऊ होऊ ''६

'म्हणून वाटतं बायांनो' या कवितेतून कवयित्री स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करते. प्रस्थापित व्यवस्थेमध्ये पुरूषांनी स्त्रीला खूप छळले. त्यामुळे तिच्या भावनांची थडगी बांधली गेली. जितेपणी तिला मरण यातना भोगाव्या लागल्या. त्यामुळे स्त्री—पुरूष समानताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करणारा शिवाजी जन्माला घालण्यासाठी स्वतःलाच जिजाऊ झाल्याशिवाय गत्यंतर नाही. अशी कविता जणू सुंदर भविष्यकाळाचे भाष्य करणारी दिसून येते.

''बॉल झाल्या तुझ्या आकांक्षा
बॅट त्याच्या हाती आहे
खेळत असतात तेच सारे
गतीत धावणं इकडून तिकडं
हीच तुझी स्थिती आहे.''७

कवयित्री 'स्त्रीकोष' या कवितेतून स्त्रीच्या जीवनाची वाताहत मोजक्याच शब्दात. दैनंदिन प्रतिमा प्रतिकांच्या सहाय्याने नोंदवितात. स्त्री आपल्या मनामध्ये कितीतरी सुंदर संसाराची चित्रे रेखाटते. परंतु त्या स्वप्नांना पुरुषाकडून हद्दपार केले जाते. तिने संसाराची मांडणी करायची त्याने ती उधळायची, तिने जमवाजमव करायची त्याने ती विस्कटून द्यायची असा पुरूषांचा टुटप्पीपणा दिसून येतो. स्त्रीची कुठेही हेटाळणी केली जाते.ही जाणिव आता स्त्रीमध्ये येऊन तिला आपली भूमिका समजू लागलेली आहे.

एकविसाव्या शतकातील स्वाती शिंदे—पवार यांची कविता स्त्रीवादी विचारांची जोपासणा करणारी व स्त्री—पुरूष समताधिष्ठित समाजरचना तयार करण्यासाठी लढा देणारी कविता आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही

माधुरी आशिरगडे यांनी आकनाद या कविता संग्रहातून आपल्या महाशक्तीच्या प्रकोपाचे दर्शन पुरुषाला दाखविले पाहिजे. याविषयी स्त्रीला सामर्थ्य देताना म्हणतात,

''तू झालंच पाहिजेस
नवदूर्गा चंडिनी
पौरूषांचा कणा मोडीत अपौरूषेय पराक्रम गाजवित''८

प्राचीन काळामध्ये स्त्रियांनी केलेल्या पराक्रमाची त्यांना जाणिव कवयित्री करून देत पुरूषी वर्चस्वाला आव्हान देण्याविषयी प्रेरित करते. बंडाची प्रेरणा प्रस्थापित पुरुषसत्ताकतेला उलथवून आपले स्थान मजबूत करण्यासाठीची धडपड व्यक्त करते. तर कवयित्री प्रतिभा सराफ यांच्या 'तू पाहते' या कवितेतून प्रस्थापिताविरुद्ध स्त्रीचा आवाज बुलंद करण्याची धडपड व्यक्त करते,

''नाही पंखात बळ
तरी ती उडू पाहते.
एक साधीशी बाई
आता लढू पाहते ''९

स्त्रीला आलेल्या आत्मभानाची जाणिव कवितेतून व्यक्त होते. आपल्यावरील अन्यायाविरूध्द ती शस्त्र घेऊन लढते आहे. यातून स्त्रीजागृती धडपड व्यक्त होते. स्त्रिया वरील अन्याय थांबवण्यासाठी कोणीही देवदूत येणार नाही तर तो आपल्यालाच थांबवावा लागेल तो आपणच थांबू शकतो अशी आशा कविता मोरवणकर पवार यांनी धर्मयुद्ध कवितेतून स्त्रीधर्म निर्माण करण्यासाठी धर्मयुद्ध करणाऱ्या स्त्रीचे वर्णन केलेले आहे. त्या लिहितात,

''नारी
आता आपणच थांबवू शकतो,
हे धर्मयुद्ध ''१०

पारंपारिक धर्मातील स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या बाबी आपणच थांबवून आपला स्वधर्म आपण निर्माण करायला हवा, धर्माधर्मातील तेढ आपणालाच नष्ट करावयाची आहे. असे कवयित्री सुचवितात एकूण स्त्रीमध्ये जागृती करणारी कविता साकारलेली आहे.

संजीवनी तडेगावकर यांनी 'फुटवे' या काव्यसंग्रहातून मुक्तपक्षाप्रमाणे आकाशात संचार करणारी कविता लिहिली आहे.

'''भयमुक्त पाखरासारखं
सुळकांडी मारून

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

समाज संस्कृतीच्या कालबाह्य लक्तरांना
द्यावं भिरकावून ''११

माझं अस्तित्व गतकाळापासून लपवत आलेली लक्तर झुगारून देऊन सारे। क्षितिज कवेत घेऊन जगावं, आपल्या पंखाचं सामर्थ्य सर्वांना दाखवावं आणि आपलं स्वतंत्र अस्तित्वही निर्माण करावं असा स्त्रीमुक्तीचा विचार कवयित्री मांडते. तर कवयित्री विमल लिमये यांनी स्त्रीच्या अस्तित्वाविषयी अस्तित्व नसल्याचीच वस्तुस्थिती मांडलेली आहे. त्या लिहितात,

'पट माझा सोंगट्य माझ्या फासेही माझेच
मनासारख दान मात्र तुला
घर माझे– नेटनेटकेपणा माझा–गृहस्वामिनी मीच
दारावर मात्र तुझ्या नावाची पाटी''१२

स्त्रीची फक्तं काबाडकष्ट करण्यासाठी, मुलांना जन्म घालण्यासाठी आणि घर–संसार सांभाळण्यापुरतीच ओळख आहे. तिला या पलिकडे घरात कोणी विचारीत नाही. स्त्रीला फक्त गृहीत धरून समाजव्यवस्था धावते आहे. असे कवयित्री म्हणते.

शीला निपुणगे यांनी विसरता येत नाही मधून स्त्रीजन्माला समाजामध्ये कशा प्रकारे नाकारले जाते, त्यामुळे मातेची होणारी गळचेपी रेखाटली आहे.

'विसरता येत नाही तिला त्याचा उतरलेला चेहरा
आणि तिच्याकडे टाकलेल्या नजरेतला तिरस्कार
विसरता येत नाहीत तिला त्याचे भ्याड उदार
जाताना मित्रापाशी ओकलेला विखार,''१३

कवयित्रीने मुलीचा जन्म झाल्यावर चोहिकडून नाराजीचे सूर कसे निघतात आणि हे सूर जन्मभर विसरता येत नाहीत, ती त्याच विचारात कुढत राहते. हे स्त्रीजन्माचा तिरस्कार करणारे समाजवास्तव कवितेतून व्यक्त केलेले आहे.

डॉ. सीमा साखरे आपल्या कवितेतून मांडतात,

''मुलीच्या जन्माचे टपकणारे
अश्रू कमी होत नाही
ते नऊच अठरा, अठराचे छत्तीस,
छत्तीसचे बहात्तर होतील पण वंशाचा दिवा म्हणून
रडक्या मुलाचेच गुण सारेच गातील''१४

कवयित्री सामाजातील एक जळजळीत समाजसत्य येथे विशद करतात. मुलीच्या जन्मामुळे कपाळावर आठ्य पडतात. नाराजीचे सूर ऐकायला मिळतात. याउलट मुलगा नाकर्ता, ऐतखाऊ असला तरी त्याला डोक्यावर घेऊन मिरविण्याची समाजाची प्रवृत्ती असते. हे कवितेतून व्यक्त केले आहे.

**निष्कर्ष :–**

एकविसाव्या शतकातील स्त्रीवादी कविता एक नव्या उमेदीने प्रस्थापित पुरुषीसमाज व्यवस्थेवर प्रहार करताना दिसते.

स्त्री मुक्ती चळवळीची प्रेरणा घेऊन केवळ दुःखद भावना व्यक्त करीत बसत नाही तर दुःखाचा उदय झाला तिथे घाव घालण्याचे काम करत आहे. समाजातील चालीरीती,परंपरा आणि धार्मिकता स्त्रीला कशी खिळखिळी करीत आहे. हे तिला समजले आहे.स्त्री शक्तीचा जागर कवितेतून व्यक्त केला आहे. मुलांना जन्म घालताना होणाऱ्या वेदना ती कवितेतून मांडते आहे.

गर्भात वाढणाऱ्या मुलात आणि मुलीत काय फरक आहे याचे चित्र ण कवितेतून व्यक्त होताना दिसत आहे . मुलीला जन्म देणाऱ्या आईचाही आणि मुलीचा समाज अवहेलना करतो हे काव्यातून व्यक्त केले. मुलगा कसाही असला तरी त्याचे गुणगान समाज गातो असे अनेक बारकावे स्त्रीवादी कवितेतून येताना दिसतात. स्वातंत्र्य समतेची मागणी करणारी स्त्री मुक्तीसाठी संघर्ष करणारी कविता जन्म घेताना दिसते.

**संदर्भ ग्रंथ–**

1. पाटील शोमा, 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७. पृ.४४–४५.

२) सुमंत यशवंत, 'स्त्रीवादाची ओळख', पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे, डिसेंबर २०१२, पृ.५५.

३) सरकटे सदाशिव, स्त्रीवादी भूमिका व काव्य–स्त्रीकोष, उ.नि.पू. ६०.

४) तत्रैव, उ.नि. पृ. १३६.

५) तत्रैव, उ.नि. पृ. १२८.

६) तत्रैव, उ.नि. पृ.१२०.

७) तत्रैव, उ.नि. पृ.१०४.

८) सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता, उ.नि.पृ. १५६.

९) तत्रैव, उ.नि.पृ.१५६.

SHIVAJI COLLEGE HINGOLI
PRINCIPAL
Shivaji College, HING